**Dr.Kirit Somaiya**
**B. Com., F.C.A. Ph. D**
**Ex - Member of Parliament**

All India Convenor : BJP Investors' Cell
Vice President : BJP - Maharashtra

**di;k idk'kukFk**

25 सप्टेंबर, 2005

## feBh unh inf"kr dj.kk&;k 44 vkLFkkiukuk egkikfydp cnhp vkn'k

महापालिकेने मिठी नदी प्रदुषित करणा–या 44 आस्थापनांना बंद करण्याचे आदेश आतापर्यंत दिले आहेत. महापालिकेच्या एस्, के–पूर्व, एल् आणि एच्–पूर्व विभागांनी आतापर्यंत एकंदर 812 व्यावसायिक, आस्थापनांना प्रदुषणा संबंधीच्या नोटिसा दिल्या आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने भाजपा नेते व माजी खासदार डॉ.किरीट सोमैया यांच्या जनहित याचिके दरम्यान मिठी नदी काठावरच्या, नदीला प्रदुषित करणा–या सर्व व्यावसायिक आस्थापनांना कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. महापालिकेने 21 सप्टेंबर पर्यंत हे काम पूर्ण करावयाचे होते.

अजूनपर्यंत 812 आस्थपनांपैकी फक्त 263 आस्थापनांची सुनावणी झाली आहे. त्यापैकी 44 आस्थापनां संबंधी निर्णय, आदेश देण्यांत आले आहेत. या सगळयांना मिठी नदी प्रदुषित करण्यासाठी आपली आस्थापने बंद करण्याचे आदेश महापालिकेने दिले आहेत.

साधारणरित्या हे सगळे मिठी नदी काठावर भंगार, तेल मिश्रण करणे, रद्दी पेपर, गॅरेजेस, तबेले, वेल्डिंग मशिन, हिटर दुरुस्ती आदी प्रकारचे व्यवसाय करतात. बहुतेकांकडे त्याचे लायसन्सही नाही, प्रदुषण नियंत्रण करण्याची व्यवस्थाही नाही, अशा निष्कर्शावर महापालिका येत आहे. महापालिकेची कार्यवाही खुप धिमी चालत असल्याचे दिसत आहे.

मिठी नदी महापालिकेच्या चार वॉर्डातून वाहते. त्याअनुसार त्या वार्डातील मिठी नदी प्रदुषित करणा–या आस्थापनांचा विस्तृत तक्ता खालीलप्रमाणे :–

| okM | ukVh l | luko.kh | vkn'k |
|---|---|---|---|
| 'एस्' (भांडुप) | 47 | 10 | – |
| 'के–पूर्व' (मरोळ) | 29 | 29 | 29 |
| 'एल्' (कुर्ला) | 591 | 194 | – |
| 'एच्–पूर्व' (सी.एस्.टी. रोड) | 145 | 30 | 15 |

डॉ.किरीट सोमैयांच्या जनहित याचिकेच्या 31 ऑगस्टच्या सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने 21 सप्टेंबरपर्यंत कारवाई पूर्ण करुन 26 सप्टेंबरला अहवाल सादर करण्याचा निर्णय दिला होता. शासन–प्रशासन, सरकारी वकिलांच्या विनंतीमुळे 26 सप्टेंबरची सुनावणी आता 3 ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलण्यांत आली आहे.

**ifl/nh lfpo**

● ***President :*** **YUVAK PRATISHTHAN** ● ***President :*** **INVESTORS' GRIEVANCES FORUM**
(ISO 9001 : 2000 Certified) (ISO 9001 : 2000 Certified)

● Neelam Nagar, Mumbai 400081. Tel.: 25644151 ● 11, Ashoka Road, New Delhi 110001 E-mail : kirit@vsnl.in